# दि. २७ फेब्रुवारी २०१९

**<u>यशवंतराव भोंसले कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालामध्ये मध्ये 'मराठी भाषा गौरव दिन' उत्साहात साजरा.</u>**




दि. २७ फेब्रुवारी २०१९ रोजी कविवर्य वी. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीचे औचित्य साधून येथील यशवंतराव भोंसले कॉलेज ऑफ फार्मसी व यशवंतराव भोंसले कॉलेज ऑफ डी. फार्मसी, सावंतवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे उदघाटन कुसुमाग्रजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. याप्रसंगी यशवंतराव भोंसले एज्युकेशन सोसायटी चे सचिव मा. श्री. संजीव देसाई, यशवंतराव भोंसले कॉलेज ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ. विजय जगताप व पदविका विभागाचे विभाग प्रमुख श्री. सत्यजित साठे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रथम वर्ष विद्यार्थीनी कु.निवेदिता देवकर हिने केले. त्यानंतर कु. यशवंत तिळवे, कु. ओमकार नांचे, कु. ओंकार पन्हाळकर यांनी वि. वा. शिरवाडकर यांचा जीवनपट उलगडून सांगितला. साहित्य क्षेत्रातील त्यांचे योगदान व मराठी भाषेला एका वेगळया उंचीवर नेऊन ठेवण्याचे त्यांचे अतुलनीय कार्य याबाबत तिने विस्तृत माहिती दिली. याप्रसंगी शिरवाडकर यांच्या जीवनावर आधारित एक लघुचित्रफीतही विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली. प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदविका महाविद्यालयाची कु. क्षितिजा शिंत्रे व कु. सेजल

बिर्जे यांनी कुसुमाग्रजांच्या काही प्रसिद्ध कविता वाचून दाखवल्या. महाविद्यालयाचे विभागप्रमुख श्री. सत्यजित साठे यांनी मराठी भाषेचा प्रज्वल इतिहास उलघडून सांगितला तर प्राचार्य डॉ. विजय जगताप यांनी मराठी भाषा अंगीकारण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी मराठी भाषेचा इतिहास व अनेक विविध वैशिष्ट्ये वर्णन करणारी चित्रफीत सर्व विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नमिता भोसले तर आभार प्रदर्शन प्रा. मयुरेश रेडकर यांनी केले. सदर कार्यक्रमाला प्रथम व द्वितीय वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदविका महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर उपस्थित होते.























प्रा. सत्यजित साठे
विभागप्रमुख

डॉ. विजय जगताप
प्राचार्य